नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा-२) सुकाणू समितीचे सह अध्यक्ष यांच्या करिता प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई येथे १-लघुलेखक व १-शिपाई (मेसेंजर) अशाप्रकारे बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्याकरीता २ पदांच्या निर्मितीबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक:- कृवपदुम-१९०४६/४२/२०२५-MAG-८A (१२०७१४५)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०२६

वाचा :

१. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.३०/०६/२०२३
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.नादेकृ ४६२२/प्र.क्र.९४/८-अे, दि.१४/१०/२०२४
३. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र कृवपदुम-१९०४६/३६/२०२५-MAG-८A (E-११६८०५०), दि.०८/०७/२०२५
४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.कृवपदुम-१९०४६/१३/२०२५-MAG-८A (ई-१२०७१४५) दि.०५/०८/२०२५
५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय, क्र.कृवपदुम-१९०४६/४४/२०२५-MAG-८A (ई-१२६२२८५) दि.१३/१२/२०२५
६. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प यांचे पत्र क्र. NDKSP-१२०४१(२९)/२५/२०२५-O/O ADM-NDKSP/२८७२६३५ दि.१९/१२/२०२५
७. उप समितीच्या बैठकीचे इतिवृत्त दि.०३/०७/२०२६

प्रस्तावना :-

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प अंतर्गत अंदाजित रु.६००० कोटी किंमतीचा प्रकल्प टप्पा-२ राबविण्यास संदर्भाधीन दि.३०/०६/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये तत्वत: मान्यता देण्यात आली आहे. तसेच, संदर्भाधीन दि.१४/१०/२०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यासाठी अकोला, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, बीड, बुलडाणा, हिंगोली, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, धाराशिव, परभणी, वर्धा, वाशिम, यवतमाळ, नाशिक, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २१ जिल्हयांमधील ७२०१ गावांची निवड करण्यात आली आहे. तसेच, प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यास दिनांक ०८/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे.

२. विभागस्तर, जिल्हास्तर, उपविभागस्तर व गावसमूह स्तरावर प्रकल्पाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु करण्यापूर्वी प्रकल्पास मनुष्यळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता १२५७ पदांच्या आकृतीबंधास संदर्भाधिन दि.०५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. संदर्भाधिन दि.१३/१२/२०२५ रोजीच्या शासन

निर्णयान्वये प्रकल्पासाठी सुधारित सुकाणू समितीच्या रचनेस मान्यता देऊन श्री.रणधीर सावरकर, विधानसभा सदस्य यांची सुकाणू समितीच्या सह अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या सुकाणू समितीचे सह अध्यक्ष यांना त्याचे कामकाजाकरिता १-लघुलेखक व १-शिपाई (मेसेंजर) अशाप्रकारे एकूण २ पदांची (बाह्ययंत्रणेद्वारे) निर्मिती करण्याबाबत संदर्भाधिन क्र.५ येथील पत्रान्वये प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पा यांच्याकडून विनंती करण्यात आली आहे. यानुषंगाने अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने दि.०३/०७/२०२६ रोजीच्या बैठकीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रक्ल्प टप्पा-२ च्या प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्तरावर १-लघुलेखक सेवा बाह्ययंत्रणेद्वारे सेवा कराराने घेण्यास मान्यता प्रदान केली आहे. तसेच, शिपाई हे पद अकुशल पदामध्ये येत असल्याने सदर पदावर बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्यासाठी विभाग स्तरावर निर्णय घेण्याबाबत मान्यता दिली आहे. त्यानुसार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुकाणू समितीचे सह अध्यक्ष यांचेकरिता बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्तरावर २ पदांची निर्मिती करण्याबाबत शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:-

१. कृषि व पदुम विभागाच्या दि.०५/०८/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाकरिता १२५७ पदांच्या (१७२ नियमित पदे व १०८५ पदांच्या मनुष्यबळ सेवा बाह्ययंत्रणद्वारे) आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. आता, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या सुकाणू समितीच्या सह अध्यक्ष यांचेकरीता बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन कक्ष स्तरावर खालीलप्रमाणे २ पदांच्या निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे :-

अ.क्र.	**बाह्ययंत्रणेद्वारे घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवांचा तपशील**	**ठोक वेतन (अधिकतम मर्यादा)**	**मनुष्यबळ सेवा संख्या**
१	लघुलेखक	रु. ५०,०००/- पर्यंत ठोक वेतन	१
२	शिपाई/ मेसेंजर	रु. ३५,०००/- पर्यंत ठोक वेतन	१

२. शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व जागतिक बँकेने आखून दिलेल्या धोरणानुसार प्रकल्पाने मनुष्यबळ सेवा संस्थेची निवड केली असल्यास, सदर बाह्ययंत्रणेव्दारे उक्त नमूद २ पदांवर मनुष्यबळ सेवा घेण्यात याव्यात; अन्यथा, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार व जागतिक बँकेने आखून दिलेल्या धोरणानुसार बाहययंत्रणेव्दारे घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा संस्थेची निवड करुन उक्त नमूद २ पदांवर मनुष्यबळ सेवा घेण्यात याव्यात.

३. सदर प्रकल्पांतर्गत बाहययंत्रणेव्दारे घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा घेण्यासाठी निर्माण केलेली उपरोक्त नमूद १ पदे व त्या पदांवर नियुक्त करण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवा केवळ प्रकल्प कालावधीपर्यंतच चालू राहतील. प्रकल्प कालावधी संपुष्टात आल्यानंतर सदर २ पदे व त्यावर नियुक्त केलेल्या मनुष्यबळ सेवा देखील संपुष्टात येतील व कोणत्याही परिस्थितीत सदर मनुष्यबळ सेवांचा शासकीय सेवेत समावेश करण्यात येणार नाही. यासंदर्भात प्रकल्प संचालकांनी संबंधित मनुष्यबळ पुरवठा करणाऱ्या संस्थेशी करारनामा करतेवेळी योग्य ती खबरदारी घ्यावी व बाहययंत्रणेव्दारे घेण्यात येणाऱ्या मनुष्यबळ सेवांचे शासनावर कोणतेही बांधिल स्वरुपाचे दायित्व निर्माण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

४. उपरोक्तपणे मंजूर करण्यात आलेल्या पदांसाठी बाह्यस्त्रोद्वारे मनुष्यबळ सेवा घेण्यात आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या मानधनावरील खर्च प्रकल्पाच्या पुढील लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागवावा-

मागणी क्र.डी-३,

२४०१- पीक संवर्धन

(११५) लहान / सिमांत शेतकरी व कृषी मजूरांसाठी योजना

(००) (०८) नानाजी देशमुख कृषि संजीवनी टप्पा-२ (हवामान अनुकूल कृषी प्रकल्प टप्पा-२)

(राज्य हिस्सा ३०%) (कार्यक्रम)

१० कंत्राटी सेवा, (२४०१B५४४)

५. सदर शासन निर्णय अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीच्या दि.०३/०७/२०२६ झालेल्या बैठकीमध्ये पदनिर्मितीस दिलेल्या मान्यतेस अनुसरून, तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १५४/२०२६/व्यय-१, दिनांक ०८/०४/२०२६ अन्वये प्राप्त मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२६०७३०१८०८०४०५४६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

GANPAT SANDIPAN KACHARE

Digitally signed by GANPAT SANDIPAN KACHARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agri and Adf dept, 2.5.4.20=3021BF955FEFD71FFAD5DD7C97769147F19ACA6383A12FED6CFF4849D78E224A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=B5B30AEBA818C77E43E7B8BA4BCA0E9F0D137FEAB0BBCB16CACF2D44087E8A76, cn=GANPAT SANDIPAN KACHARE
Date: 2026.07.30 18:09:50 +05'30'

(ग. सं. कचरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
२. मा. उपमुख्यमंत्री (रा.उ.शु.,अल्पसंख्यांक विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (नगरविकास विभाग), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मा. मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद विधानभवन, मुंबई
६. सर्व मा. राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७. सर्व संसद सदस्य/महाराष्ट्र विधानसभा सदस्य/महाराष्ट्र विधानपरिषद सदस्य
८. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. अपर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
११. प्रधान सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२. प्रधान सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१३. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई

१५. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
१६.संचालक, माहिती व तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई
१७.संचालक (लेखा व कोषागारे), संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१८.सर्व उप सचिव/ सह सचिव, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९.विभागीय आयुक्त (नाशिक/ अमरावती/नागपूर/छत्रपती संभाजीनगर)
२०.सर्व जिल्हाधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२१.कुलगुरू, महात्मा फुले कृषि विद्यापीठ,राहुरी, जिल्हा- अहिल्यानगर
२२.कुलगुरु, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
२३.कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी
२४.विभागीय कृषि सहसंचालक (सर्व)
२५.सहसंचालक (लेखा व कोषागारे), कोकण विभाग, कोकण भवन, बेलापूर, नवी मुंबई.
२६.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला
२७.जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी (सर्व)
२८.प्रकल्प संचालक (आत्मा), सर्व
२९.उपविभागीय कृषि अधिकारी (सर्व)
३०.तालुका कृषि अधिकारी (सर्व)
३१.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखापरिक्षा / लेखा अनुज्ञेयता)
३२.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३३.निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई,
३४.वित्त विभाग (व्यय-१/सेवा-९/आपुक), मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
३५.नियोजन विभाग (कार्यासन-१४३१), मंत्रालय, मुंबई-४०००३२,
३६.निवड नस्ती.